मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कचरा संकलन केंद्रासाठी पर्यायी जागेचा शोध!

## स्थानिक नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी ।** मोशी येथील सिल्व्हर-९ सोसायटीलगत प्रस्तावित कचरा संकलन केंद्राला पर्यायी जागेसाठी महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचनेनुसार, तीन जागेंची पाहणी करण्यात आली.

त्यामुळे स्थानिक नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सिल्वर-९ सोसायटीजवळ नियोजित कचरा संकलन आणि वितरण केंद्र सुरू करण्याबाबत हालचाली सुरू होत्या. या पार्श्वभूमीवर चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला होता. दरम्यान, आमदार महेश लांडगे यांची सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. त्यानुसार आमदार लांडगे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना ''लोकवस्तीमध्ये कचरा संकलन केंद्र नकोच..'' अशी सूचना केली होती.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने नियोजित कचरा संकलन आणि वितरण केंद्र हलविण्यासाठी इतर ठिकाणी जागेचा पर्याय देण्याबाबत सांगितले होते. यावर सोमवारी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी, आमदार लांडगे यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी यांच्या समवेत तीन जागांची पाहणी करण्यात आली आहे. यापैकी एका ठिकाणी कचरा संकलन केंद्र स्थलांतरित करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

त्यावर आयुक्त शेखर सिंह काय निर्णय घेतात? याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> **“महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मागणीनुसार, आज आम्ही प्रस्तावित कचरा संकलन केंद्रासाठी पर्यायी जागा दाखवली आहे. या जागेचा प्रस्ताव, पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडून आयुक्तांकडे पाठवण्यात येणार आहे. संबंधित कचरा संकलन केंद्राचे स्थलांतर पर्यायी जागेत करण्यात यश मिळेल, अशी अपेक्षा आहे. तसेच, महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा विचार करावा, अन्यथा आंदोलनात्मक भूमिका कायम राहणार आहे.**
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष,**
> **चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी**

# पिंपळे सौदागर येथे नवीन पोस्ट ऑफीस कार्यालय सुरु होणार

## नाना काटे यांच्या पाठपुराव्यास यश,नागरिकाची पोस्ट ऑफीसची वणवण संपणार

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** रहाटणी पिंपळे सौदागर येथे लवकरच नविन पोस्ट ऑफीस सुरू होणार असुन त्यासाठी भारतीय डाकघर विभाग व महापालिका यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत पत्रव्यवहाराद्वारे तसे कळविले आहे. नाना काटे यांनी पोस्ट ऑफीस व महापालिका विभागा यांना दिलेल्या पत्रात असे नमुद केले की, प्रभाग क्र २८ रहाटणी पिंपळे सौदागर या प्रभागात ८० हजार ते १ लाख व त्यापेक्षा जास्त लेकसंख्या आहे, या परिसरात खासगी, व सरकारी शाळा, महाविद्यालये, तसेच संरक्षण विभागाचे कार्यालय, निवासस्थान, सरकारी व खासगी बँकाचे व आयटी पार्कचे कार्यालय आहेत. परिसरातील नागरिकांना पोस्ट ऑफीस बाबत कामे करण्यासाठी,औधं किंवा पिंपरी, चिचवड च्या पोस्ट ऑफीस मध्ये जावे लागत असल्याने नागरिकांना याचा त्रास व मोठी गैरसोय होत असल्याचे पोस्ट ऑफीस विभाग व मनपा विभाग यांच्या निदर्शनास आणुन दिले होते, त्यासाठी रहाटणी पिंपळे सौदागर येथे नविन पोस्ट सुरू व्हावे, यासाठी २०१२ पासून पत्रव्यवहार देखील नाना काटे व शितल काटे यांनी वेळोवेळी पोस्ट ऑफीस विभाग व महापालिका यांच्याकडे केला होता व सातत्याने प्रयत्न देखील करीत होते.





### प्रशासकीय कामास सुरूवात

**» नवीन पोस्ट ऑफिससाठी लागणारी महापालिकेची पर्यायी जागा देखील सुचविली होती त्याची पाहणी देखील मनपा व पोस्ट विभागाच्या अधिकारी वर्सोगाबत केली होती. त्याचेच यशप्राप्त म्हणुन त्यास अनुसरून पोस्ट ऑफीस विभाग व महापालिका यांनी रहाटणी पिंपळे सौदागर येथे नविन सुरू करण्याच्या प्रशासकीय कामास सुरूवात करण्यात आली आहे तसे पत्राद्वारे देखील त्यांनी कळविले आहे. त्यामुळे रहाटणी पिंपळे सौदागर परिसरात नवीन पोस्ट ऑफिस सुरु होणार असल्याने नागरिकाची पोस्ट ऑफीसची वणवण आता संपणार आहे.**

# मेट्रो प्रवाशांचे पार्किंगसाठी वेट अँन्ड वॉच

## पिंपरीसह शहरातील सहाही मेट्रो स्थानकांच्या परिसरात वाहनतळ नाही

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गेल्या वर्षी सहा मार्चपासून पिंपरीतून फुगेवाडीपर्यंत धावणारी मेट्रो एक ऑगस्टपासून थेट शिवाजीनगर सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत धावू लागली आहे. तेथून पूर्वेला पुणे स्टेशन, रूबी हॉल क्लिनिक स्थानक आणि पश्चिमेला कोथरूड वनाजपर्यंत जाता येत आहे.

दररोज सरासरी ५० हजार प्रवासी लाभ घेत आहेत. शहराच्या वेगवेगळ्या भागातून स्वतःची दुचाकी वा चारचाकी वाहनांनी ते मेट्रो स्थानकापर्यंत येतात. मात्र, पिंपरीसह शहरातील सहाही मेट्रो स्थानकांच्या परिसरात वाहनतळ (पार्किंग) नसल्याने वाहने उभी करायची कुठे? असा प्रश्न पडत आहे.

पुणे मेट्रोची स्वारगेट ते पिंपरी मार्गिका शहरात आहे. त्यावर पिंपरी-चिंचवड महापालिका भवन (पीसीएमसी), संत तुकारामनगर (वल्लभनगर), भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी अशी सहा स्थानके आहेत. गेल्या सहा मार्चपासून पीसीएमसी ते फुगेवाडीपर्यंत मेट्रो धावत होती. तिचा उपयोग केवळ हौस म्हणून नागरिक करीत होते. आता एक ऑगस्टपासून पुण्यातील सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत मेट्रो धावत आहे. तिथे उतरून वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गाने वनाजपर्यंत आणि रामवाडीच्या दिशेने रूबी हॉल क्लिनिक स्थानकापर्यंत जाता येत आहे.

त्यामुळे शिवाजीनगर, सिव्हिल कोर्ट, पुणे रेल्वेस्थानक, बालगंधर्व, डेक्कन, गरवारे कॉलेज, नळ स्टॉप, आनंदनगर, कर्वेरोड, वनाज आदी स्थानकांवर उतरून पुण्यात विविध भागात जाणे शक्य झाले आहे. त्याचा लाभ सामान्य प्रवाशांसह विद्यार्थी, नोकरदार, पर्यटक घेऊ लागले असून मेट्रो प्रवासी संख्याही वाढली आहे. त्यातील बहुतांश जण दुचाकीने व हौस म्हणून येणारे चारचाकी वाहनांनी मेट्रो स्थानकापर्यंत येत आहेत. त्यांची वाहने उभी करण्यासाठी स्वतंत्र वाहनतळच नसल्याने गैरसोय होत आहे.



### इथे 'पार्किंग' शक्य

» पीसीएमसी मेट्रो स्थानकानजीक मोरवाडी चौकालगत आणि कमला क्रॉस रोड इमारतीच्या मागील महापालिका भूखंड; वल्लभनगर एसटी आगार व पूर्वीच्या आयसीसी कंपनीच्या शेजारी; कासारवाडी रेल्वे स्थानक व शंकरवाडी रस्त्यालगत, नाशिक फाटा चौकालगत; फुगेवाडी महापालिका शाळा परिसर व खासगी कंपनी परिसर; दापोडी स्थानकालगत. वाहनतळांना जागा नसल्यास मेट्रो स्थानकांना जोडणाऱ्या पीएमपीच्या वर्तुळ मार्ग व फिडर सेवेतील बसगाड्यांची वारंवारिता वाढवावी लागेल.

> "मेट्रो स्थानकांच्या परिसरात स्वतंत्र वाहनतळ उभारण्याचे नियोजन नाही. 'आय टु आर' अंतर्गत (औद्योगिक ते निवासी) असलेला कासारवाडी येथील एक भूखंड मेट्रोला देण्याचे नियोजन होते. त्यावर मेट्रो स्वतः वाहनतळ विकसित करणार होती. पुढे काही चर्चा झाली नाही. अन्य ठिकाणच्या वाहनतळांबाबत अद्याप काही ठरलेले नाही."
>
> **- मकरंद निकम,** शहर अभियंता, महापालिका

> "आज मंगळवार असल्याने दगडूशेठ गणपतीला दर्शनासाठी जायचे आहे. तुळशीबागेत काही खरेदीही करायची आहे. त्यानिमित्त मेट्रो पाहता येईल, या हेतूने टू व्हिलरने इथे आलो. मेट्रोच्या गेटच्या बाजूला गाडी लावली. पण, सेक्युरिटींनी ती काढायला लावली. म्हणून मेट्रोच्या पुलाखाली खांबांच्या मध्ये गाडी लावली."
>
> **एकनाथ सुरवसे,** मोरे वस्ती, चिखली

### महामार्गावर 'पार्किंग'

» पीसीएमसी स्थानक परिसरात मुंबई-पुणे महामार्गाच्या सेवा रस्त्यालगत मेट्रो मार्गाच्या पिलरच्या मध्ये वाहने उभी केली जात आहेत. स्थानकाच्या विरुद्ध दिशेच्या सेवा रस्त्यावर महापालिकेने 'पे अँड पार्क' केले आहे. ती जागा पुरेशी नाही. मेट्रो प्रवाशांसाठी स्वतंत्र वाहनतळ नाही. वल्लभनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी स्थानकांच्या परिसरातही अशीच स्थिती आहे. कासारवाडी, फुगेवाडी व दापोडी स्थानकांच्या एका बाजूला कंपन्या, नागरी वस्ती आणि दुसऱ्या बाजूला सीएमईची सीमा भिंत आहे. त्यामुळे महामार्गाच्या सेवा रस्त्यालगतच वाहने उभी केली जातात.

### 'पीएमपी'ही रस्त्यावरच

» शहरातील उपनगरांतून मेट्रो स्थानकांपर्यंत येण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) बस सेवा सुरू केली आहे. काही वर्तुळ मार्ग असून काही सरळ मार्ग आहेत. यात पिंपरी- नेहरूनगर- यशवंतनगर- मोरवाडी- पिंपरी; डीलक्स चौक- काळेवाडी- थेरगाव- डांगेचौक- चिंचवड-लिंकररस्ता- पिंपरी स्थानक; दापोडी- जुनी सांगवी- नवी सांगवी- पिंपळे गुरव- दापोडी स्थानक अशा मार्गांचा समावेश आहे. या मार्गांवर धावणाऱ्या पीएमपी बससुद्धा महामार्गाच्या सेवारस्त्यालगतच प्रवाशांना सोडतात व प्रवासी घेण्यासाठीही तिथेच उभ्या केल्या जातात. त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करायला हवी.

---

# त्रिवेणीनगरमध्ये महिलांसाठी पारंपारिक खेळांची संस्कृती उत्साहात

## नागपंचमी, श्रावणी सोमवारनिमित्त खेळ झिम्मा फुगडीचा

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** त्रिवेणीनगरमध्ये यावर्षीही नागपंचमी, श्रावणी सोमवारनिमित्त महिलांसाठी पारंपारिक खेळ, झोका, फुगडी, मंगळागौर आदी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच रंगतदार खेळ, गप्पा, गाणी धमाल, मेजवाणीदेखील आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रम सोमवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता त्रिवेणीनगर येथील राम मंदिरासमोर निलेश भालेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. माजी नगरसेविका अरुणाताई दिलीप भालेकर तसेच भाजपचे युवा नेते निलेश दिलीप भालेकर यांच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सुमारे ४०० महिलांनी सहभाग नोंदविला. यावेळी उपवासाचे फराळ, नाष्टा वाटप करण्यात आला. झिम्मा, फुगडी, झोके, मंगळागौरची गाणी, फिल्मी गाणी आदी मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले.




# मनपा ते भोसरी प्रवास आता अधिक जलद

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे मनपा ते भोसरी दरम्यानचा प्रवास आता अधिक जलद गतीने होणार आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपीएमएल) मनपा ते भोसरी या मार्गावर वातानुकूलित विनाथांबा / विनावाहक बस सेवा सुरु करण्यात आली आहे. पीएमपीएमएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या संकल्पनेतून ही बससेवा सुरू करण्यात आली आहे.

त्यामुळे प्रवासी नागरिकांना जलद पोहचणे शक्य होणार असून तिकीट दर हा अन्य बस प्रमाणेच असणार आहे. पुणे मनपा ते भोसरी या मार्गावर प्रायोगिक तत्त्वावर बससेवा सुरु करण्यात आली आहे. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सचिन्द्र प्रताप सिंह, चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) सतिश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी सतिश गाटे, वाहतूक नियोजन अधिकारी विजय रांजणे, भोसरीचे डेपोचे डेपो मॅनेजर भास्कर दहातोंडे, न.ता. वाडी डेपोचे डेपो मॅनेजर संतोष किरवे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सचिन्द्र प्रताप सिंह म्हणाले की, प्रवासी नागरिकांना जलद प्रवासी सेवा देण्याच्या उद्देशाने पुणे महानगर परिवहन महामंडळाने मनपा ते भोसरी या मार्गावर दोन बसच्या माध्यमातून विनाथांबा / विनावाहक बस सेवा सुरु केली आहे. प्रवासी नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला तर बसेसमध्ये आणखी वाढ करण्यात येईल.

# आमदार बच्चू कडुंचा केंद्र सरकारवर हल्लाबोल!

## मोदी सरकार फक्त ग्राहकांचा विचार करतं, शेतकऱ्यांचा नाही

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

केंद्र सरकार केवळ सत्ता टिकवण्याचा विचार करत आहे. सरकार नामर्दासारखे वागत आहे. केवळ सत्तेसाठी ग्राहकाचा, खाणाऱ्याचा विचार केला जातो. मग पिकवणाऱ्या विचार का केला जात नाही. सरकारने ही नालायक वृत्ती सोडली पाहिजे, अशा घणाघाती शब्दांत आमदार बच्चू कडू यांनी मोदी सरकारवर प्रहार केला. कांद्यावर लादण्यात आलेले ४० टक्के निर्यातशुल्क आणि किरकोळ बाजारपेठेत कांद्याच्या वाढलेल्या दरावरुन सध्या राज्यात प्रचंड गदारोळ सुरु आहे. पिंपरी येथे 'दिव्यांग विभाग आपल्या दारी'या कार्यक्रमासाठी आलेल्या बच्चू कडू यांनी या सगळ्या परिस्थितीवर सविस्तरपणे भाष्य केले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार ताशेरे ओढले.



ज्या लोकांना कांदा परवडत नसेल त्यांनी लसुण किंवा मुळा खाण्यात काही गैर नाही. केंद्र सरकार कांद्याचे दर वाढल्यावर हस्तक्षेप करते. मग भाव कमी झाल्यानंतर सरकार हस्तक्षेप का करत नाही?, असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला. काही दिवस कांदा खाल्ला नाही तर कोणी मरणार नाही. केंद्र सरकारला कांद्याच्या निर्यातीवर शुल्क लावण्याची गरज नव्हती. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये कांद्याचे भाव वाढू नयेत, यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करुन ठेवली आहे. सरकार इतका नालयाकपणा का करत आहे? अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात कांद्याच्या भावावारुन सरकार पडले होते. पण त्यामुळे केंद्र सरकारने इतके घाबरण्याची काय गरज आहे? मोदीजी 'मेक इन इंडिया, मेड इन इंडिया'चा नारा देतात. मग या इंडियातील माल परदेशात कस जाईल, ही त्यांची भूमिका असली पाहिजे. कांदा परदेशात गेला तर त्याला सफरचंदाचा भाव मिळेल. त्यासाठी केंद्र सरकारने निर्यात धोरणात स्पष्टता आणली पाहिजे. तसे केल्यास आम्ही एकही जागा न मागता केंद्र सरकारला पाठिंबा देऊ, असे बच्चू कडू यांनी म्हटले.

### केंद्र सरकार दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करणार

**» केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याकडून मंगळवारी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. निर्यात शुल्क वाढवल्याने धास्तावलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना या घोषणेमुळे काहीप्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यानुसार केंद्र सरकार, नाफेड आणि एनसीसीएफ यांच्याकडून राज्यातील नाशिक, पिंपळगाव, लासलगाव, अहमदनगर आणि संपूर्ण पट्ट्यात कांदा खरेदी केली जाणार आहे. सरकारकडून २४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने कांद्याची खरेदी केली जाईल.**

पुढे बोलताना कडू म्हणाले की, कोणी काय बोलले यापेक्षा दिव्यांगाचे प्रश्न तुम्ही माध्यमांनी मांडावे. दिव्यांगाचे प्रश्न समोर आले पाहिजे. केंद्र सरकारने आयात निर्यात धोरणामध्ये केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. मी एक सीट न मागता आम्ही एनडीएला पाठींबा दिला आहे. पायात चप्पल न घालाता आम्ही फिरू असे देखील कडू म्हणाले आहेत. नवनीत राणा यांना धमकी आल्यानंतर ते काय एवढं महत्वाचं आहे का? मला देखील मारण्याची धमकी आली मग आम्ही काय म्हणायचं असा चिमटा देखील त्यांनी नवनीत

# पालिकेची हद्द वाढणार, हिंजवडीसह सात गावांचा समावेश

## पाणी, रस्ते, वीज, सांडपाणी या मूलभूत सुविधांचा अभाव

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

हिंजवडीसह माण, मारुंजी, जांबे, नेरे, सांगवडे आणि गहुंजे या सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्यास राज्य सरकारने अनुकूलता दर्शविली आहे. त्यामुळे गेल्या आठ वर्षांपासून प्रलंबित विषय मार्गी लागण्यास मदत होणार आहे. हिंजवडीसह सात गावांच्या पालिकेतील समावेशाबाबत मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आग्रह धरला आणि याबाबतची भूमिका स्पष्ट केली. आयटी नगरी असलेल्या हिंजवडीचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. त्या तुलनेत विकास झालेला नाही. पाणी, रस्ते,




### प्रस्ताव २०१५पासून प्रलंबित

हिंजवडीसह सात गावांचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत करण्याचा प्रस्ताव पालिकेच्या सभेत फेब्रुवारी २०१५मध्ये मंजूर करण्यात आला. त्यानंतर तो मंजुरीसाठी जून २०१५मध्ये सरकारकडे पाठविण्यात आला. मात्र, अद्यापपर्यंत निर्णय झाला नाही. त्यानंतर २०२०मध्ये पुणे पालिकेची हद्दवाढ झाली. मात्र, पिंपरी-चिंचवडचा प्रस्ताव प्रलंबितच आहे. त्याबाबत निर्णयाची प्रतीक्षा आहे.

वीज, सांडपाणी या मूलभूत सुविधांचा अभाव आहे, या मुद्द्याकडे बारणे यांनी सरकारचे लक्ष वेधले.

'हिंजवडी, माण क्षेत्रात अनेक नामांकित आयटी कंपन्या आहेत. अनेकांची कार्यालये आहेत. त्यामध्ये काम करणाऱ्या कुशल कामगारांची संख्याही मोठी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून नागरिक वास्तव्यास आहेत; परंतु त्यांना मूलभूत सुविधांअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. गहुंजे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम आहे. मात्र, या गावात अद्यापही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पुरेसे नाही. त्यामुळे अशुद्ध पाणी थेट नदीपात्रात सोडले जाते. नदीचे प्रदूषण वाढले आहे. या गंभीर मुद्याकडे सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे,' अशी भूमिका घेतल्याचे बारणे यांनी स्पष्ट केले.

वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामपंचायतींना नागरी सुविधा देणे शक्य होत नाही. सुविधांसाठी गावांचा समावेश पालिकेत करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. मुळशी तालुक्यातील ही सात गावे पालिकेच्या नजीक आहेत. त्यांचा पालिकेच्या हद्दीत समावेश झाल्यास झपाट्याने विकास होऊ शकेल, असा दावा बारणे यांनी केला आहे. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> **“गावांचा विकास आणि नागरिकांना सोयी सुविधा मिळण्याच्या अनुषंगाने हिंजवडी, माणसह सात गावे पालिकेत असणे गरजेचे आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना आळा बसण्यास मदत होणार आहे. गावे समावेशाबाबत सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.**
>
> **श्रीरंग बारणे,** खासदार

# 'लकी ड्रॉ' काढून घोषणा पण बक्षिस नाही!

## पालिकेला आतापर्यंत खरेदीची प्रक्रिया का पूर्ण करता आली नाही

पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी। प्रामाणिक करदात्यांसाठी 'लकी ड्रॉ' काढून पालिकेने विजेत्यांची घोषणा केली खरी; पण या विजेत्यांना देण्यासाठी अद्याप कारची खरेदी बाकी आहे. ही खरेदी निविदा प्रक्रियेतच अडकली आहे. वास्तविक चार महिन्यांपूर्वीच 'लकी ड्रॉ' योजना जाहीर झाली असताना पालिकेला आतापर्यंत खरेदीची प्रक्रिया का पूर्ण करता आली नाही, असा सवाल आता उपस्थित होत आहे. महापालिकेतर्फे या वर्षी पहिल्यांदाच प्रामाणिक करदात्यांना प्रोत्साहन म्हणून 'लकी ड्रॉ' योजना राबवली गेली. त्याची सोडत रविवारी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत काढण्यात आली. या 'लकी ड्रॉ' योजनेअंतर्गत भाग्यवंत मिळकतधारकांना पाच पेट्रोल कार, १५ ई-बाइक, १५ मोबाइल फोन, १० लॅपटॉप अशी एकूण ४५ बक्षिसे जाहीर करण्यात आली. आता या विजेत्यांना बक्षीसे कधी मिळणार, याची माहिती घेतली असता, यासाठीची निविदा प्रक्रियाच अद्याप पूर्ण झाली नसल्याचे समोर आले. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागातर्फे ही प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, यासाठीच्या बक्षिसांची खरेदी प्रक्रिया भांडार व मोटारवाहन विभागातर्फे राबवली जाणार आहे. या दोन्ही विभागांकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बक्षिसांचे वितरण केले जाईल, असे कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त डॉ. अजित देशमुख यांनी सांगितले. 'लकी ड्रॉ'मधील विजेत्यांसाठी वाहन खरेदीची निविदा काढण्यात आली होती. त्याला प्रतिसाद न मिळाल्याने १९ तारखेला फेरनिविदेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. लवकरच ही प्रक्रिया पूर्ण होईल, असे मोटार वाहन विभागाचे उपायुक्त राजू नंदकर यांनी सांगितले. तर, लॅपटॉप व मोबाइल फोनची निविदाप्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या दोन दिवसात लॅपटॉप व मोबाइल पालिकेला उपलब्ध होतील, असे भांडार विभागाच्या उपायुक्त डॉ. चेतना केरूरे यांनी सांगितले.




### पुणे महापालिकेचा अजब कारभार

**» महापालिकेच्या बहुचर्चित लकी ड्रॉची सोडतही जाहीर झाली आहे. मात्र, अद्याप कोणती पेट्रोल कार खरेदी करायची, याचाच निर्णय झालेला नसल्याचे समोर आले आहे. नेमकी कोणती आणि किती किमतीची कार घ्यायची यावर विचारविनियम सुरू आहे. त्यातच सोडतीमध्ये कारचे बक्षीस मिळालेल्या माजी नगरसेविकेने कारऐवजी रुग्णवाहिका देण्यात यावी, अशी लेखी मागणी केल्याच्या वृत्ताला अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी दुजोरा दिला आहे. दरम्यान, कार खरेदीच्या फेरनिविदेलाही प्रतिसाद मिळाला नाही, तर थेट खरेदी करण्याबाबतही पालिका चाचपणी करत आहे.**

# मुहूर्त काढून दरोडा टाकला, १ कोटींचं घबाड लागलं हाती!

## बारामतीतील धक्कादायक प्रकार, चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

बारामती। न्यूज एक्सप्रेस मराठी। लग्न, गृहप्रवेश, वाहनखरेदी आदी शुभकार्यासाठी मुहूर्त काढले जातात, हे आपण नेहमीच ऐकतो. मात्र चोरट्यांनी चक्क ज्योतिषाकडून जबरी चोरीचा मुहूर्त काढला. चोरीही यशस्वी झाली. परंतु मुहूर्त काढूनही चोरटे पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बारामती तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देवकाते नगर येथील महिलेचे हातपाय बांधून तिला मारहाण करत तब्बल १ कोटी ७ लाख रुपयांचा दरोडा टाकणाऱ्या चोरट्यांना पकडण्यात पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेला यश आलं आहे. या प्रकरणी सहा दरोडेखोरांना अटक करण्यात आली आहे. सचिन अशोक जगधणे (वय ३०, रा. गुणवडी, २९ फाटा, ता. बारामती), रायबा तानाजी चव्हाण (वय ३२, रा. शेटफळ हवेली, ता. इंदापूर), रविंद्र शिवाजी भोसले (वय २७, रा. निरावागज, बारामती), दुर्योधन उर्फ दिपक उर्फ पप्पू धनाजी जाधव (वय ३५, रा. जिंती हायस्कूलजवळ, ता. फलटण, जि. सातारा), नितीन अर्जुन मोरे (वय ३६, रा. धर्मपुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर) याच्यासह रामचंद्र वामन चव्हाण (वय ४३, मूळ रा. आंदरुड, ता. फलटण, जि. सातारा, सध्या रा. वडूज, ता.खटाव, जि. सातारा) अशी या दरोड्यातील आरोपींची नावे आहेत. सागर शिवाजी गोफणे हे पत्नी तृप्ती व दोन मुलांसह देवकाते नगर येथे राहतात. दि. २१ एप्रिल रोजी सागर हे तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी त्यांची पत्नी तृप्ती व मुले घरी होती. घरी असताना रात्री ८ वाजताच्या सुमारास दरोडेखोरांनी गोफणे यांच्या घराच्या कंपाउंडवरून घरात प्रवेश करत तृप्ती यांना मारहाण केली. तसेच त्यांचे हात-पाय बांधून त्यांच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबून ९५ लाख ३० हजाराची रोख रक्कम, ११ लाख ५९ हजार रुपयांचे २० तोळे दागिने, ३५ हजार रुपयांचा मोबाईल असा १ कोटी ७ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी अज्ञातांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती. सदर चोरीचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी हे स्वतः या चोरीच्या तपासावर लक्ष देऊन होते. त्यानुसार पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी स्थानिक गुन्हे शाखेची पथके नेमली होती. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय खबरीच्या आधारे अखेर दरोडेखोरांना जेरबंद करण्यात आले. विशेष म्हणजे आरोपींनी आपण पकडले जावू नये, याची पुरेपुर खबरदारी घेतली होती. कोणताही मागमूस मागे ठेवला नव्हता. या गुन्ह्यातील आरोपी एमआयडीसीतील मजूर असल्याची माहिती मिळाल्यानंतर संशयितांवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. वेगवेगळ्या ठिकाणाहून वरील दरोडेखोरांना ताब्यात घेण्यात आले आहे.



### २६ तोळ्याचे दागिने हस्तगत

**» सागर गोफणे हे जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करत असल्याने त्यांच्याकडे भरपूर पैसा असल्याची माहिती आरोपी सचिन जगधणेला मिळाली होती. जगधने याने सदर गुन्ह्याचा कट रचला आणि आरोपी रामचंद्र चव्हाण या ज्योतिषाकडे मुहूर्त काढून हा जबरी दरोडा टाकण्यात आला होता. अद्यापपर्यंत पोलिसांनी ७६ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्यात ६० लाख ९७ हजाराची रोख रक्कम असून १५ लाख ३५ हजार रुपये किमतीचे २६ तोळ्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.**